## रे.द.नं. ०८/२०१९ मधील निशाणी क्रमांक १५ खालील आदेश

त्रयस्थ पक्षकार/अर्जदार धोंडाबाई ज्ञानू जाधव व सखाराम ज्ञानू जाधव यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० या तरतूदींप्रमाणे सादर करुन असे कथन केले आहे की, प्रस्तुतची दरखास्त रे.क.नं.२९/२०१६ (जुना रे.क.नं.३७७/२०१७) मधील हुकूमनामेप्रमाणे मौजे कोलीक, गावचे हद्दीतील गट नं.२०५ एकूण क्षेत्र ५०.६ आर या मिळकतीसंदर्भात केलेल्या नोंदणीकृत कब्जे गहाणपत्र दस्त क्र. ६३४/२०१२ नुसार एकतर्फा आदेश घेवून दरखास्तदार यांनी दाखल केली आहे. गट नं.२०५ मधील संपूर्ण मिळकत ही वाडवडीलार्जीत मिळकत असून सदर मिळकतीची नोंद सातबारा उता–याप्रमाणे वि.प.नं.१ म्हणजेच ज्ञानू देवबा जाधव यांचे नांवे दिसून येते. त्रयस्थ पक्षकार/अर्जदार क्र.१ धोंडाबाई या वि.प.नं.१ यांच्या पत्नी असून वि.प.नं.२ यांच्या आई आहेत. त्रयस्थ पक्षकार/अर्जदार क्र.२ सखाराम हे वि.प.क्र.१ यांचा मुलगा असून वि.प.क्र.२ यांचे सख्खे भाऊ आहेत. वि.प.क्र.१ व २ तसेच त्रयस्थ पक्षकार/अर्जदार यांचेमध्ये अदयाप सदर मिळकतीसंदर्भात सरस निरस मानाने वाटप झाले नाही अगर इतर कोणताही दस्त झालेला नाही.

०२. सदर मिळकतीबाबत वि.प.नं.१ व २ यांनी परस्पर त्रयस्थ

पक्षकार/अर्जदार यांचा हक्क डावलून तथाकथित कब्जे गहाण दस्त दरखास्तदार यांचे नांवे करुन दिला आहे. त्यामुळे प्रस्तुत दरखास्तीमध्ये त्रयस्थ पक्षकार/अर्जदार यांना पक्षकार करणे आवश्यक आहे. तसेच न केल्यास त्रयस्थ पक्षकार/अर्जदार यांचा हक्क डावलला जाणार असून त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्रयस्थ पक्षकार/अर्जदार हे दरखास्तमध्ये आवश्यक पक्षकार असून त्यांचे उपस्थितीशिवाय प्रस्तुत प्रकरणाचा निकाल गुणदोषावर होणे अडचणीचे आहे. त्रयस्थ पक्षकार/अर्जदार यांना याकामी पक्षकार म्हणून सामील करुन घेतले नाही तर प्रकरण बाहुल्य होणार आहे. तरी त्रयस्थ पक्षकार/अर्जदार यांना या कामी वि.प.क्र.३ व ४ म्हणून सामील करण्यात यावे अशी विनंती करण्यात आली आहे.

**०३.** दरखास्तदार यांनी नि.क्र.१८ वर म्हणणे सादर करुन असे प्रतिकथन केले आहे की, मूळ दाव्याचे कामी पटलावरील कागदपत्रांचा व कायदेशीर बाबींचा विचार करुनच न्यायालयाने दावा मंजूर केला आहे. त्यावर कोणत्याही वरीष्ठ न्यायालयात अपील दाखल नसल्याने सदर दाव्यातील निर्णय आजही कायम आहे. सदर मिळकतीबाबत आजअखेर वाटपाचा दावा कोणत्याही न्यायालयात प्रलंबित नाही. वि.प.नं.१ व त्यास मान्यता देणार म्हणून वि.प.नं.२ यांनी दरखास्तदार यांचेकडून भरीव रक्कम स्विकारुन नोंदणीकृत दस्त पूर्ण केला आहे. त्याबाबत दाव्यामध्ये संपूर्ण उहापोह झाला आहे. त्रयस्थ पक्षकार/अर्जदार यांचा मंजूर झालेस कायदेशीर गुंतागुंत होण्याची दाट शक्यता आहे. दरखास्त कामी त्रयस्थ पक्षकार म्हणून सामील करण्याची तरतूद नाही. मूळ दावेचे कामी झालेल्या आदेशाच्या बाहेर

न्यायालयास जाता येणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती दरखास्तदार यांनी केली आहे.

**०४.** दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. वस्तूस्थितीप्रमाणे प्रस्तुत दरखास्त ही रे.क.नं.३७७/२०१७ मधील दि.०८.०१.२०१९ रोजीच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दाखल केली आहे. सदर हुकूमनाम्याप्रमाणे यातील वि.प. यांनी दरखास्तदार यांना दि.१४.०३.२०१२ रोजीच्या नोंदणीकृत कब्जे गहाणपत्र दस्ताप्रमाणे दरखास्तमध्ये नमूद मिळकतीचे खरेदीपत्र करुन देण्याचा आदेश झाला आहे. त्यामध्ये प्रस्तुत त्रयस्थ पक्षकार/अर्जदार हे पक्षकार नाहीत.

**०५.** तथापि, प्रस्तुत त्रयस्थ पक्षकार/अर्जदार यांनी वि.प.क्र.१ व २ यांचेशी त्यांचे नातेसंबंध दर्शविणारा तसेच दरखास्तमध्ये नमूद केलेल्या मिळकतीशी त्यांचा हक्क किंवा संबंध आहे असे दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा प्रस्तुत अर्जासोबत सादर केलेला नाही. तसेच त्रयस्थ पक्षकार/अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० या तरतूदींप्रमाणे त्यांना याकामी पक्षकार म्हणून सामील करुन घेण्यासाठी दिला आहे. तथापि, सदर तरतूदींचे अवलोकन केले असता त्या केवळ दाव्यास लागू होत असल्याचे दिसून येते व त्या तरतूदी दरखास्तीस लागू होतात असे दिसून येत नाही.

**०६.** सबब, उपरोक्त नमूद कारणांस्तव प्रस्तुत अर्ज कायदयाने चालण्यास

पात्र नसल्याने तो नामंजूर करणे आवश्यक आहे. सबब, खालील प्रमाणे आदेशः–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाहीत.

Vinod Vilas Khulape

Digitally signed by Vinod Vilas Khulape
Date: 2022.04.18 17:24:16 +0530

( वि.वि.खुळपे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कळे–खेरीवडे.

दि.१८.०४.२०२२.